**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (National Rural Livelihoods Mission) (NRLM) रुपांतर करून ते राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (State Rural Livelihoods Mission) (SRLM) स्वरुपात राज्यात राबविणे.**

**पथदर्शी प्रकल्पात (पायलट प्रोजेक्ट), ठाणे, वर्धा व उस्मानाबाद या ३ जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

शासन निर्णय क्रमांक: एनआरएलएम -२०११/प्र.क्र.१९६/योजना-३

दिनांक : १९ ऑक्टोबर, २०११.

वाचा :- शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक: एनआरएलएम -२०११/प्र.क्र.१९६/योजना-३, दिनांक : १८ जुलै, २०११.

**पार्श्वभुमी** :-

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोगार योजनेचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात करण्याच्या निर्णयानुसार राज्यात महाराष्ट्र राज्य, ग्रामीण जीवनोन्नती अभियान (State Rural Livelihoods Mission) (SRLM)) सन २०११-१२ पासून राबविण्याचा निर्णय,शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक: एनआरएलएम -२०११/प्र.क्र.१९६/योजना-३, दिनांक : १८ जुलै, २०११ अन्वये घेतला आहे. त्यानुसार, प्रथमत: प्रत्येक महसूल विभागामध्ये सर्वात कमी मानवी निर्देशांक असलेला एका जिल्ह्यातील काही ब्लॉक व ग्रामपंचायतीतील भागात (Clusters) हे अभियान सुरु करावयाचे आहे. याप्रमाणे, पहिल्या टप्प्यात (१) रत्नागिरी (२) नंदुरबार, (३) सोलापूर (४) जालना (५) यवतमाळ व (६) गडचिरोली या जिल्ह्यातील ठराविक ब्लॉक मधील काही ग्रामपंचायत समुहात (Clusters) राबविण्यात येणार आहे.

तथापि, राज्यातील आदिवासीबहुल भाग, दारिद्र्य रेषेखालील भाग, तेथील कुपोषण, शिक्षणस्तर, आदिवासी जमाती, उत्पन्न स्त्रोत तसेच अवर्षणग्रस्त भाग विचारात घेऊन केंद्र शासनाने मुभा दिल्यानुसार अधिक जिल्ह्ये, पहिल्या टप्प्यात पथदर्शी प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने, शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय**

उपरोक्त,(१) रत्नागिरी (२) नंदुरबार (३) सोलापूर (४) जालना (५) यवतमाळ व (६) गडचिरोली या जिल्ह्यांबरोबरच पहिल्या टप्प्यात ठाणे, वर्धा व उस्मानाबाद या जिल्ह्यातही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सन २०११-१२ पासून राबविण्यात येईल.

कृ.मा.प.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१११०१९१४४६०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( सुधीर ठाकरे )
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
सचिव, नियोजन/वित्त / सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/ सहकार/कृषि व पदुम/उद्योग, उर्जा व कामगार/ आरोग्य/ शालेय शिक्षण/ उच्च व तंत्र शिक्षण/ रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा(प.), मुंबई.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
संचालक युनिसेफ/SIRD, पुणे/ जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
आयुक्त, इन्स्टीटयूशनल फायनन्स/ पाणलोट/ महिला व बाल विकास समिती.
अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
सह संचालक, एग्राविका कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, (५प्रतींसह)
निवडनस्ती